नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :–१७/७/२०१०

**–: परिपत्र :–**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्रं. १ (के) अन्वये शुक्रवार दि. १६/७/२०१० रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता भरलेल्या माहे जुलै २०१० या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्रं. १५८**

संदर्भ :– १) मा.अविनाश जाधव यांचे दि. २८/५/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. २५३ दि. ८/६/२०१०.
३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्रं. मआ/भवन/१६६ दि.२८/६/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्र. ४३०, दि. ८/७/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ८३ घोरपडे पेठ येथील तलावाचे उर्वरित कामे पूर्ण करणेकामी र.रुपये ५० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–११ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्र. १४६, अ.क्र.२, शहरातील विविध मंड्यामध्ये विकास कामे करणे, (यादी क्रं.एस.२९), पान क्रं.२२६, अनु.क्रं. ७ वॉर्ड क्रं.८३ मधील कर्मशाळेच्या जागेत व्यवसायिक संकुल उभारणे. | ५० लाख | ––– |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. ८३ घोरपडे पेठ येथील तलावाचे उर्वरित कामे पूर्ण करणे. | ––– | ५० लाख |

**विषय क्रं. १५९**

संदर्भ :– १) मा.सौ.चाँदबी नदाफ व मा.हनिफ शेख यांचे दि. ११/५/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १७८ दि. १३/५/२०१०.
३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्रं. मआ/भवन/१६७ दि.२८/६/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्र. ४३१, दि. ८/७/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ३९ मध्ये भाजी मार्केटचे ओटे बांधण्यासाठी २५ लाखाचे व वॉर्ड क्र. ३९ मध्ये व्यायामशाळा बांधणेसाठी र.रुपये २५ लाखाचेअशी एकूण र.रु. ५० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक, २.प्राथमिक शिक्षण, पान क्र. ११६, अ.क्र. ४, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस–२३), पान क्र. २१३, अ.क्र. २१, वॉर्ड क्र. ३९ मध्ये इंग्रजी माध्यमाची नविन शाळा बांधणे (एकूण तरतुद र.रुपये १.५० कोटी) | ५० लाख | ––– |

<u>नविन सुचविलेले काम</u>

| | | |
|---|---|---|
| १) वॉर्ड क्र. ३९ मध्ये भाजी मार्केटचे ओटे बांधणे | --- | २५ लाख |
| २) वॉर्ड क्र. ३९ मध्ये व्यायामशाळा बांधणे | --- | २५ लाख |

**<u>विषय क्रं. १६०</u>**

संदर्भ :- १) मा.संतोष आरडे व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि. ८/७/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ४५३, दि. ८/७/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे शहर पातळीवर वारकऱ्यांना संघटीत करुन या पंथाच्या सर्वांगीण प्रचार व प्रसारासाठी सन १९५३ मध्ये भारतीय वारकरी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळाचे ११० भजनी मंडळ आणि दिंड्या सभासद आहेत. या मंडळामार्फत भजन, किर्तन, प्रवचन, पारायण या व अशा अध्यात्मिक कार्यक्रमांबरोबरच विविध विषयांवरील व्याख्याने, परिसंवाद, कार्यशाळा, व्यसनमुक्ती प्रकल्प, समता बंधुभाव, सु-संस्कार वर्ग इत्यादी अनेक सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रांमध्ये कार्यक्रम राबविले जात आहेत.

वारकरी सांप्रदायिक भजन, किर्तन, पखवाज वादन, तबला वादन, हार्मोनियम वादन, संस्कार वर्ग, संतसाहित्याचा सांगोपांग अभ्यास, पाठांतर इत्यादीचे शिक्षण वर्ग विनामुल्य करणे, वारकरी संत वाड.मयाचे प्रकाशन करणे, वाचनालय, ग्रंथालय निर्माण करणे, नियमितपणे सांप्रदायिक नामसप्ताह आयोजित करणे आणि या सर्वांच्या माध्यमातून संप्रदायाचा प्रसार व प्रचार करणारी चारित्र्यसंपन्न, ध्येयवादी, नितीमान साधकांची फळी निर्माण करणे, पूर्णवेळ काम करणारे वारकरी कार्यकर्ते घडविणे अशी अनेक विधायक कामे भविष्यात भारतीय वारकरी मंडळाचा मुख्य उद्देश आहे.

त्यांच्या या कार्यासाठी जागेची आवश्यकता असून शाहू तलावाजवळील मनपाच्या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील हॉल भारतीय वारकरी मंडळास नाममात्र भाड्याने देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्रं. १६१</u>**

संदर्भ :- १) मा.सुनिल बिबवे व मा.उज्ज्वल केसकर यांचे दि. ८/७/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ४५४, दि. ८/७/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

श्री.भास्कर काळुराम जाधव हे सन १९८६ साली नगरसचिव कार्यालयाकडे बिगारी या हुद्यावर खुल्या गटातून कामावर लागले असून त्यांची मनपामधील सेवा २५ वर्षे पुर्ण झालेली आहे. परंतू त्यांना अद्याप शिपाई या पदावर बढती देण्यात आलेली नाही. श्री.मच्छिंद्र नामदेव बहिरट हे नगरसचिव कार्यालयाकडील सेवक शिपाई या पदावर सेवेत असताना मयत झाले असल्याने खुल्या गटाची शिपाई या पदाची जागा रिक्त झालेली आहे.

तरी श्री.भास्कर काळुराम जाधव हे बिगारी या पदावर सेवाज्येष्ठ सेवक असल्याने त्यांची शिपाई या पदावर नेमणूक करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्रं. १६२</u>**

संदर्भ :- १) मा.शंकर पवार, मा.हनिफ शेख व मा.संतोष आरडे यांचे दि. ८/७/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ४५५, दि. ८/७/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

श्री.योगेश लक्ष्मणराव दोडके यांनी हिंद केसरी किताब मिळविल्याबद्दल त्यांना रुपये ५ लाख आर्थिक सहाय्य देणेबाबत मनपा मुख्य सभा ठराव क्र. ३५१ दि. २३/९/२००७ अन्वये मान्यता देण्यात आली असून या ठरावास मे.राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने क्र. पीएमसी ३००७/६४३/प्रक्र. ३९०/ नवि २२, दि. ५/१/२००८ अन्वये विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

हिंद केसरी श्री.योगेश लक्ष्मणराव दोडके यांना रुपये ५ लाख आर्थिक सहाय्य देणेसाठी वर्गीकरणाद्वारे रक्कम उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

सदर वर्गीकरणाचे अधिकार मा.महा.आयुक्त यांना देणेत येत आहेत.

**विषय क्रं. १६३**

संदर्भ :– १) मा.विजय देशमुख, मा.अशोक हरणावळ व मा.बाबु वागसकर यांचे दि.८/७/२०१० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ४६०, दि. ८/७/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

महाराष्ट्र केसरी कैलासवासी हिरामण बनकर यांचे चिरंजीव विजय बनकर हे महाराष्ट्र केसरी झाले आहेत. तरी त्यांनादेखील रुपये ५ लाख देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. १६४**

संदर्भ :– १) पुणे महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे ( विनियमन ) आदर्श उपविधी २००९ ला मा.मुख्य सभा ठ.क्र.३०८, दि. २५/११/२००९ ने दिलेली पूर्व प्राथमिक मान्यता.

२) पुणे मनपा हॉकर्स पुनर्वसन कमिटी बैठक दि.२१/५/२०१० मधील निर्णय.

३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उआ (वि)/१५८, दि. २१/६/२०१० चे पत्र.

४) मा.सौ.अश्विनी कदम व मा.सचिन भगत यांची दि. ८/७/२०१० ची उपसूचना.

५) विधी समिती ठराव क्र. २१, दि. ८/७/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे ( विनियमन ) आदर्श उपविधी २००९ च्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रा सोबत जोडलेल्या अंतिम मसुदयास व मसुद्यातील भाग १ मधील १ .२ मधील क्र.५ मध्ये खालील दुरूस्तीस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

संदर्भ क्र. ४ च्या उपसूचनेनुसार

कुटूंब म्हणजे पती – पत्नी, त्यांची १८ वर्षापेक्षा कमी वय असलेली मुले व दोघांवर अवलंबून असलेले त्यांचे आई – वडील अशी सुधारित व्याख्या धरण्यात यावी.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**